**<u>वादी नं. १ यांचा उर्वरीत उलटतपास प्रतिवादींचे सुविदय विधिज्ञ श्री. ई. ए. पठाण यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०१६/२ च्या मालक सदरी अर्जून म्हेत्रे याचे नावे ५ आर क्षेत्राची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी गट क्र १०१६/२ च्या सात बारा उता–यावर मालक म्हणून माझ्या नावाची नोंद नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, प्रतिवादीने स्वताच्या नावाची नोंद लावून घेतली आहे. हे मला माहित नाही की प्रतिवादीच्या नावाची नोंद कधी लागली. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल तारखेपासून आजपर्यंत प्रतिवादीचे नाव कमी करण्याबाबत मी प्रांतांकडे दाद मागितली नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, आता मला तो अपिल क्रमांक सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की दिवाणी दावा क्र. ३१५/२०१४ चे पुढे काय झाले याची चौकशी मी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नगरपरिषद मिळकत क्र. ७९४१/७६७४ चे खरेदी माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, नगरपरिषद मिळकत क्र. ७९४१/७६७४ चे खरेदी खत अर्जुन म्हेत्रे ने मला करुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे खरेदी खतामध्ये गट क्र. १०१६ चा उल्लेख केलेला नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र. ३१५/२०१४ मध्ये गट मिळकत क्र. ७६७४ व प्रस्तुतच्या दाव्यामध्ये मिळकत क्र. ७९४१ असा नमूद केलेला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की त्या टाईप मिस्टेक मुले चुकीच्या नमुद केल्या गेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या वकीलांना मिळकत क्र. ७९४१ / ७६७४ सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की दिवाणी दावा क्र. ३१५/२०१४ मध्ये मी मालकी मागितली होती तसेच प्रस्तुतच्या दाव्यामध्ये मी निरंतर ताकीद मागितली आहे. हे मला माहित नाही की, गट क्र. १०१६/२ मध्ये प्रतिवादीने बांधकाम करण्याकरीता नगरपिरषद जामखेड यांचा परवाना मागितला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, प्रतिवादीने त्यातील काही क्षेत्रावर

बांधकाम केले आहे किंवा कसे. हे मला माहित नाही की गट क्र. १०१६/२ मधील २२ आर क्षेत्र दत्तु व अर्जुन यांनी शब्बीर हनीफ याच्याकडून खरेदी घेतले किंवा कसे.

९. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०१६/२ चा २००५ च्या खरेदी खताने मी मालक नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने माझे क्षेत्रामध्ये पाया खोदला व अतिक्रमण केले. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात अतिक्रमण काढून मागण्याची, प्रतिवादीने केलेले बांधकाम पाडूण मागण्याची मागणी केली नाही. हे मला माहित नाही की, प्रतिवादी बांधकाम केलेल्या क्षेत्रात राहतो किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यात मोजणीची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०१६/२ मध्ये माझा कोणताही संबंध नसल्यामुळे प्रतिवादीने मला हरकत अडथळा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०१६/२ चा पुर्वी व आताही मी मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना केवळ त्रास देणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पोलिसांची चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला, खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.04.08 17:15:12 +0530

**(यु.ए. भोसले )**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:– ०८/०४/२०२६
ठिकाण:– जामखेड